# <u>प्रेस नोट</u>

## ३ वर्षापासून फरार असलेल्या आरोपीस अटक

कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, गुन्हा रजि. नं.५/२०१५, भा.दं.वि.क.४५४,४५७,३८०,५११ मधील आरोपी अभिजीत अशोक रणदिवे, वय १९ वर्षे, रा.म्हाडा कॉलनी, हडपसर, पुणे नमूद आरोपी हा नमूद गुन्हयात ३ वर्षापासून फरारी होता. सदर आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, त्याचेवर पुणे शहरातील वेगवेगळया पोलीस स्टेशनमध्ये वाहन चोरी, घरफोडीचे एकूण ६ गुन्हे दाखल आहेत. आरोपी हा व्यसनी असून, तो पोलीसांना नेहमी गुंगारा देवून नजरेआड होत होता व मिळून येत नव्हता. वारंवार पुणे शहरात तो ठिकाणे बदलून राहत असे.

दि.०१/११/२०१८ रोजी कोरेगाव पार्क परिसरात आलेबाबतची माहिती तपास पथकातील पोलीस हवालदार दिनेश शिंदे यांना मिळाली. त्यांनी तात्काळ मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.मदन बहाद्दरपुरे यांना कळविली असता त्यांचे मार्गदर्शनाखाली मिळालेल्या बातमीनुसार बर्निंग घाट रोड, कोरेगाव पार्क, पुणे या ठिकाणी त्यास सापळा रचून पकडले.

सदरची कारवाई मा.श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर व मा.श्रीमती जयश्री गायकवाड, सहा.पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर, पोलीस उप निरीक्षक श्री. निखील पवार, कोरेगाव पार्क पो.स्टे. व तपास पथकातील कर्मचारी दिनेश शिंदे, अनिल मंदे, निशीकांत सावंत, रियाज शेख, रमजान शेख, संदीपकुमार गर्जे यांनी केलेली आहे.

# <u>प्रेस नोट</u>

## दुचाकी वाहन चोरास गजाआड

दि.२६/१०/२०१८ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे तपास पथकातील अधिकारी श्री.निखील पवार, तपास पथकातील कर्मचारी दिनेश शिंदे, विनोद राठोड, परशुराम पडवाळ, अनिल मंदे, निशीकांत सावंत, रियाज शेख, रमजान शेख, संदीपकुमार गर्जे असे कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पेट्रोलिंगमध्ये त्यांना इसम नामे रूपेश डेव्हिड मेढे, वय २८ वर्षे, रा.बुद्धविहार चाळ, पंचशील चौक, रामटेकडी, हडपसर, पुणे याचे ताब्यातील मोटार सायकल नं.एम एच १४ ई डब्ल्यू ३०४ हिचेवर संशयितरीत्या मिळून आला. त्याचेकडे अधिक चौकशी करता त्याने उडवाउडवीचे व समाधानकारक उत्तरे दिल्याने सदरची मोटारसायकल त्याने कोठून तरी चोरून आणल्याची दाट संशय आल्याने त्यास त्याचे ताब्यातील मोटार सायकलसह सीआरपीसी ४१(१)(ड) प्रमाणे ताब्यात घेवून अधिक चौकशी केली असता त्याने सदरची मोटारसायकल हडपसर भागातून चोरली असल्याचे निष्पन्न झाले व त्याने सदर मोटार सायकलचा नंबर एम एच १४ ई डब्ल्यू ६३०४ असा असून सुरूवातीचा ६ आकडी नंबर खोडला असल्याचे सांगितले. त्याबाबत हडपसर पो.स्टे. पुणे शहर यांचेशी संपर्क साधला असता हडपसर पो.स्टे. ला गुन्हा रजि. नं.१२०७/२०१८, भा.दं.वि.क.३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असलेबाबत समजून आले. सदर इसमास पकडून सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरची कारवाई मा.श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर व मा.श्रीमती जयश्री गायकवाड, सहा.पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर, पोलीस उप निरीक्षक श्री. निखील पवार, कोरेगाव पार्क पो.स्टे. व तपास पथकातील कर्मचारी दिनेश शिंदे, विनोद राठोड, परशुराम पडवाळ, अनिल मंदे, निशीकांत सावंत, रियाज शेख, रमजान शेख, संदीपकुमार गर्जे यांनी केलेली आहे.